आसन क्रमांक १ ------------------------------

आसन क्रमांक २ (असल्यास) ----------------------- आसन क्रमांक ३ (असल्यास)----------------

**पुणे विद्यापीठ**
**संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग**
**प्रवेशपरीक्षा २०१२ : सामाइक लेखी परीक्षा**

**रविवार, २४ जून २०१२** **वेळ** : तीन तास **एकूण गुण** : १००

---

**सूचना** : ही प्रश्नपत्रिका मराठीत आहे. प्रश्नांची उत्तरे मराठीतूनच लिहावी लागतील. आपण इंग्रजीतून उत्तरे लिहिणार असाल, तर इंग्रजी प्रश्नपत्रिका मागून घ्या. This is Marathi language version of the question paper. You will have to answer it in Marathi ONLY. If you wish to answer in English, ask for English version.

※ या प्रश्नपत्रिकेचे दोन भाग आहेत. भाग १ ची प्रश्नपत्रिका प्रथम देण्यात येईल.
※ भाग १ मधील प्रश्नांची उत्तरे प्रश्नपत्रिकेत दिलेल्या कोऱ्या जागेत लिहावयाची आहेत.
※ भाग १ पूर्ण केल्यावरच भाग २ ची प्रश्नपत्रिका देण्यात येईल.
※ भाग १ ची प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एका तासाहून जास्त वेळ लावू नये, असा आपल्याला सल्ला आहे.

---

**भाग - १ (गुण ५०)**

**प्रश्न १) पुढीलपैकी कोणत्याही १५ प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(१५)**

१) सुनामीनंतर जपानमध्ये आण्विक दुर्घटना झाली ते ठिकाण कोणते?-----------------------------------

२) भारताचे सध्याचे लष्करप्रमुख कोण आहेत?---------------------------------------------

३) २०११ या वर्षात उत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार मिळालेला अभिनेता कोण? -------------------------------

४) भूपती-सानिया मिर्झा यांनी अलिकडे जिंकलेली स्पर्धा कोणती?-----------------------------------

५) फ्रान्सचे नवनिर्वाचित अध्यक्ष कोण आहेत?---------------------------------------------

---

## For office use only

| Q. 1 (15) | Q. 2 (10) | Q. 3 (10) | Q. 4 (5) | Q. 5 (5) | Q. 6 (5) | Total (50) | Examiner's Signature |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

६) 'न्यूज ऑफ द वर्ल्ड'चे मालक कोण?---------------------------------------------

७) स्टार न्यूज वाहिनीचे बदललेले नाव कोणते?----------------------------------------------

८) खारदुंग, रोहतांग व नथु हे काय आहेत?-----------------------------------------------

९) प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचे सध्याचे अध्यक्ष कोण आहेत?----------------------------------------

१०) मिट रॉमनी हे कोण आहेत? ---------------------------------------------------

११) अखिलेश यादव हे कुठल्या पक्षाचे प्रतिनिधित्व करतात?----------------------------------------

१२) गोव्याचे मुख्यमंत्री कोण आहेत?---------------------------------------------------

१३) पहिला भारतीय चित्रपट कोणता?---------------------------------------------------

१४) उत्तर गोलार्धात दरवर्षी कोणत्या तारखेला रात्र सर्वात मोठी असते?------------------------------------

१५) आयपीएल-५ चा विजेता संघ कोणता?--------------------------------------------------

१६) पृथ्वीराज चव्हाण यांच्या अगोदर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कोण होते?-----------------------------------

१७) युरोप व उत्तर अमेरिका यांच्या दरम्यानचा महासागर कोणता? ------------------------------------

१८) जागतिक बुद्धीबळ स्पर्धेत विश्वनाथन आनंद याने कुणाचा पराभव करून जगज्जेतेपद मिळवले?--------------------

१९) जायकवाडी धरण कुठल्या नदीवर बांधण्यात आले आहे? ----------------------------------

२०) प्रकाशवर्ष हे काय मोजण्याचे एकक आहे? ------------------------------------------

**प्रश्नः २) भाषिक कौशल्ये** **(१०)**

१) पुढीलपैकी **कोणत्याही दोन** वाक्प्रचारांचा अर्थ सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करा. (२)

क) कात्रजचा घाट दाखवणे

---------------------- ------------------------------------------

--------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------

ख) राईचा पर्वत करणे

----------------------- -----------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

ग) दाती तृण धरणे

----------------------- -----------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

घ) दिवास्वप्न पाहणे

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

२) पुढीलपैकी **कोणत्याही दोन** शब्दांसाठी **प्रत्येकी दोन** समानार्थी शब्द द्या. (२)

**क)** विराट-----------------------------------------------------------

**ख)** अनुरक्त -----------------------------------------------------------

**ग)** कुंतल -----------------------------------------------------------

**घ)** सारांश -----------------------------------------------------------

**३)** पुढीलपैकी **कोणत्याही चार** शब्दांसाठी **प्रत्येकी एक** विरुद्धार्थी शब्द द्या. (२)

**क)** अमृत --------------------- **ख)** चेला ---------------------

**ग)** चल ---------------- **घ)** निशा- ------------------------

**च)** पुरोगामी-------------------- **छ)** एकी------------------------

४) पुढील वाक्यांमध्ये शुद्धलेखन, व्याकरण व विरामचिन्हे यांच्या काही चुका आहेत. सर्व वाक्ये अचूक लिहून काढा व मूळ वाक्यांतील ज्या शब्दांमधील चूक दुरूस्त केली असेल अशा शब्दांखाली रेघ ओढा. शब्दांची भर घालू नका किंवा शब्द गाळूही नका, तर फक्त चुकीच्या शब्दांच्या जागी अचूक शब्द लिहा. (४)

१) नेत्रुत्व, कर्तुत्व आणि दातुत्व हे अन्यसाधारण गुण आहेत.

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

२) बदल हिच जिवनातील स्थायी चिरंतन अमर गोष्ट आहे.

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

३) गेला आठवडात झालेल्या सामान्यात राफाएल नदाल यानं दोकोविचचा ३ १ असा पराभव केला.

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

४) ढग चमकू लागले, विजा गडगडू लागल्या आणि बघता बघता पाउस पडु लागला.

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

**प्रश्नः ३) पुढीलपैकी <u>कोणतेही पाच</u> कोण / काय आहेत व ते अलीकडच्या काळात बातम्यांमध्ये का होते ते सुमारे २० शब्दांत स्पष्ट करा. (१०)**

१) पी.ए.संगमा

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

२) आंग सान स्यू की

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

३) सत्यमेव जयते

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

४) सौमित्र चटर्जी

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

५) हाफिज सईद

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

६) डॉ. सुदाम व सरस्वती मुंडे

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

७) जनरल व्ही.के.सिंग

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

८) कुडनकुलम

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

९) मार्क झुकेरबर्ग

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

**प्रश्नः ४) पुढील जोड्या जुळवा. प्रश्नाखाली दिलेल्या जागेतील आकड्यांपुढे योग्य जोडीचे निदर्शक अक्षर लिहा. जोड्या दर्शवणाऱ्या रेघा ओढू नका. तशा रेघा ओढल्यास उत्तराला शून्य गुण देण्यात येतील.** (५)

| | |
|---|---|
| i) टॉरंट | a) टाइम्स नाऊ |
| ii) टाइमलाइन | b) टीव्ही न्यूज |
| ii) आकाश | c) टीव्ही चॅनेल |
| iv) प्रोमो | d) प्रसारण तंत्रज्ञान |
| v) ब्रेकिंग न्यूज | e) चित्रपट व दूरचित्रवाणी कार्यक्रम |
| vi) एचडी | f) फेसबुक |
| vii) ट्विटर | g) राजकीय पक्ष |
| viii) प्रवक्ता | h) शेअरिंग व डाऊनलोडिंग सॉफ्टवेअर |
| ix) लाइफ ओके | i) टॅब्लेट पीसी |
| x) अर्णब गोस्वामी | j) १४० वर्णाक्षरे |

i) ---- ii) ---- iii) ---- iv) ---- v) ---- vi) ---- vii) ---- viii) ---- ix) ---- x) ----

**प्रश्न ५) पुढीलपैकी कोणत्याही पाच लघुरूपांचे पूर्ण रूप द्या.** (५)

***(सूचना :*** *ही उत्तरे तुम्ही देवनागरी किंवा रोमन लिपीत लिहू शकता किंवा लघुरूपांची मराठीतील प्रचलित रूपेही देऊ शकता.*
*उदा. AIR- All India Radio,* ***किंवा*** *ऑल इंडिया रेडिओ* ***किंवा*** *आकाशवाणी)*

१. BNHS-----------------------------------------------------

२. NCTC-----------------------------------------------------

३. NCERT----------------------------------------------------

४. CAG------------------------------------------------------

५. IAEA-----------------------------------------------------

६. JNNURM---------------------------------------------------

७. IOC -----------------------------------------------------

८. SRA -----------------------------------------------------

**प्रश्न ६) पुढीलपैकी कोणत्याही पाच पारिभाषिक शब्दांचे / संकल्पनांचे एका वाक्यात स्पष्टीकरण करा.** (५)

१) अभिव्यक्ती स्वातंत्र्य------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

२) पॅनकार्ड ------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

३) दारिद्र्यरेषा-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

४) चलनवाढ ----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

५) सायबर पाठलाग ----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

६) लिंग गुणोत्तर -------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

७) मॅकमोहन रेषा ------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

८) टीडीआर ---------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

**संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग**
**सामाइक लेखी परीक्षा २०१२**
**विभाग दोन (गुण ५०)**

सूचनाः १) ही मराठी प्रश्नपत्रिका आहे. तुम्हाला प्रश्नांची उत्तरे फक्त मराठीतूनच लिहावी लागतील.
२) प्रत्येक प्रश्नापुढे दिलेल्या शब्दमर्यादेकडे विशेष लक्ष द्यावे.
३) व्याकरण व शुद्धलेखन यांच्या अचूकतेकडेही लक्ष द्यावे.

---

**प्रश्न १)** खालीलपैकी **कोणत्याही एका** विषयावर पाचशे शब्दांचा निबंध लिहा. (२०)

१) बसपा पराभूत, सपाला सत्ता तर काँग्रेसला धक्का
२) युरोपातील आर्थिक पेचप्रसंग
३) भारतीय चित्रपटसृष्टीची शताब्दी
४) राष्ट्रपती निवडणुकीतील राजकारण
५) लंडन ऑलिंपिकमध्ये भारताला असलेल्या संधी
६) व्यंग्यचित्रांचा वाद

**प्रश्न २)** खालीलपैकी **कोणत्याही चार** विषयांवर प्रत्येकी शंभर शब्दांत टिपा लिहा. (२०)

१) रूपयाचे अवमूल्यन
२) एसएमएस, एसएनएस व भाषेतील बदल
३) 'ऑक्युपाय वॉल स्ट्रीट'
४) महाराष्ट्रातील दुष्काळ
५) 'इंडिया अगेन्स्ट करप्शन'
६) कोलावरी डी
७) सचिन तेंडुलकर राज्यसभेत
८) पुण्यातील राजकारण

**प्रश्न ३)** फ्रंटलाईन या नियतकालिकाच्या १९ मे २०१२ च्या अंकातील भास्कर घोष यांच्या लेखातील काही भाग पुढे दिला आहे. **तो वाचून खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** (१०)

ज्याचे आपल्याला आकलन होत नाही त्याची आपल्याला नेहमी भीती वाटत असते व भीतीला नैसर्गिक प्रतिसाद म्हणून द्वेष आणि मत्सराची भावना निर्माण होते. गेल्या काही वर्षात आपण शिक्षित झालो पण खरे बघायला गेले तर लोक तुच्छतावादी व धर्मांध बनले. आमच्या मनाची कवाडे बंदिस्त झाली. आम्ही अगदी स्वतःपुरते बघू लागलो व सर्वंकष जागरूकता व आकलनापासून दूर जाऊ लागलो.

हे खरे की, इतर अनेक देशांत जसे एकात्मीकरण घडते तसे आपल्या देशात घडणे अवघड आहे. भारतातील परिस्थिती सोपी नाही कारण येथे अनेक भाषा, धर्म व पंथ, वंश व सामाजिक सवयी आहेत. यामुळेच समाजाचा एक प्रकारे पराभव होतो. भारत हा एक देश व त्याचे वैविध्यपूर्ण स्वरूप स्वातंत्र्य मिळेपर्यंत मान्य केले गेले होते कारण तोवर सगळ्यांसमोर एक समान बागूलबुवा होता. पण जशी त्या बागूलबुवाची भीती दूर झाली, तशा गोष्टी हळूहळू बदलू लागल्या. आपला संकुचितपणा स्वतंत्र राज्यांच्या मागणीस कारण ठरू लागला. केरळी, महाराष्ट्रीय, गुजराती, हरयानवी अशी ही ओळख आणखी छोटी छोटी होत गेली. झारखंडी, उत्तराखंडी, छत्तीसगडी प्रादेशिक अस्मितेचा हुंकार नंतर तेलंगणालाही त्यांच्या अस्मितेची जाणीव करून देणारा ठरला.

भारतीयांपुढे सर्वात मोठे आव्हान असे आहे की, ज्यांच्या आड लोक दडतात, त्या अनंत छोट्या छोट्या अस्मितांचे अस्तित्व मान्य करायचे, आणि मग त्या पलीकडे जाऊन ज्यात भिन्न भाषा आहेत, वेगवेगळ्या सामाजिक रूढी व परंपरा

आहेत असे भारतीयत्व समजावून घ्यायचे आणि त्याचा व्यावहारिक पातळीवर स्वीकार करायचा. भारतीय म्हणजे सरकार पुरस्कृत जाहिरातींमध्ये दाखवतात त्याप्रमाणे फेटा बांधलेली किंवा पिळदार मिशा असलेली व्यक्ती एवढाच मर्यादित अर्थ अभिप्रेत नाही. ती व्यक्ती मिशावाली असू शकेल किंवा मंगोलियन धाटणीची, सरळ केसांचीही असू शकेल.

आपण आपले वेगळेपण स्वीकारले पाहिजे आणि आपण भारतीय आहोत हेदेखील. ही स्वीकारक्षमता व जाणीव रूजण्याची सुरूवात कशी होते? ती शाळा व कुटुंबात रूजवली जाते. ही भारतीयत्वाची भावना मुलांमध्ये रूजवण्याची मोठी जबाबदारी आमच्या शिक्षकांवर आहे. मग हे शिक्षक ते करायला सक्षम आहेत काय? बहुतांश शिक्षक त्यासाठी सक्षम नाहीत असेच म्हणावे लागते. त्यामुळे याबाबत शिक्षकांना शिकवणे आवश्यक आहे. अनेक शाळा व संस्था त्यासाठी काही करीत असल्याचे दिसत नाही. कारण त्यांतील अनेकांना राजकारणाचा संसर्ग झाला आहे आणि त्यांनी स्वतःची संकुचित ओळख बाळगण्यातच धन्यता मानली आहे. त्यातूनच संकुचित अस्मितेचे अंगार फुलण्यास सुरुवात होते. राज्य सरकारी शिक्षण संस्थांना संबंधित राज्य सरकारच्या विचारांचे अनुकरण करावे लागते त्यामुळे त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. लोकशाही प्रक्रियेतील ही एक काळी बाजू आहे.

स्वयंसेवी संस्थांनी भारतीयत्वाची भावना रूजवण्यासाठी प्रयत्न करावेत असे कुणी म्हणू शकेल. भारतीय असणे म्हणजे केवळ राष्ट्रध्वजाला सलाम ठोकणे नव्हे, तर ज्याचे व्यक्तीमत्व गुंतागुंतीचे आहे आणि त्याला विविध वैशिष्ट्यपूर्ण छटा आहेत ही जाणीव पसरवण्याचं काम स्वयंसेवी संस्था करू शकतात.

हे फार कठीण आव्हान आहे. बहुधा ते पेलण्यात आपण अयशस्वी ठरू. तोपर्यंत आणखी नवीन प्रादेशिक अस्मितांचे अंगार असेच धुमसत राहतील व ज्यांना या नवीन प्रादेशिक अस्मितांना आव्हान द्यायचे आहे त्यांच्यात असहिष्णुता वाढतच राहील.

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

*(प्र. १ अनिवार्य आहे. प्र. २ ते ६मधील* **कोणत्याही चार** *प्रश्नांची उत्तरे द्या. शब्दमर्यादा:४०)*

१) वर दिलेल्या परिच्छेदासाठी दोन उचित मथळे द्या.
२) उताऱ्यातील पहिल्या विधानाशी तुम्ही सहमत आहात काय? का?
३) भारताचे वैविध्यपूर्ण स्वरूप हे स्वातंत्र्योत्तर काळात का स्वीकारले गेले?
४) भारताचे एकच विशिष्ट रूप दाखवणे शक्य आहे काय? का?
५) खऱ्या भारतियत्वाची ओळख स्वीकारायला शिकवले जाऊ शकते काय?
६) स्वतंत्र राज्यांच्या मागण्यांबाबत तुमची मते स्पष्ट करा.

-------------